RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १२५(४)] बुधवार, ऑक्टोबर ८, २०२५/आश्विन १६, शके १९४७ [पृष्ठे ४ किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ ऑक्टोबर २०२५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसपीबी-२०२१/प्र.क्र.०९(भाग-२)/सां.का.१.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाच्या कार्यालयातील अधीक्षक, गट-क आणि वरिष्ठ लिपिक, गट-क या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ :—**

(१) या नियमांना, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाच्या कार्यालयातील अधीक्षक, गट-क आणि वरिष्ठ लिपिक, गट-क या पदाचे (सेवाप्रवेश) नियम, २०२५, असे म्हणावे.

(२) हे नियम **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या :—** या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "**नियुक्ती प्राधिकारी**" याचा अर्थ, मंडळाच्या कार्यालयातील अधीक्षक, गट-क आणि वरिष्ठ लिपिक, गट-क या पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम प्राधिकारी असणारे रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाच्या कार्यालयाचे सचिव, असा आहे;

(ख) "**मंडळ**" याचा अर्थ, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, असा आहे;

(ग) "**शासन**" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(घ) "**पदोन्नतीची पात्रता**" याचा अर्थ, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी केलेले नियम, काढलेले शासन निर्णय किंवा आदेश यांमध्ये पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता, असा आहे;

**३. अधीक्षक गट-क च्या नियुक्तीचा प्रकार पुढीलप्रमाणे असेल :—**

**(क) पदोन्नतीद्वारे.—** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या मंडळाच्या कार्यालयातील अधीक्षक, गट-क पदावरील नियुक्ती, कार्यालयातील वरिष्ठ लिपिक, गट-क पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या आणि या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंडित सेवा असणाऱ्या योग्य व्यक्तीची पदोन्नती करण्यात येईल ; किंवा

**(ख) प्रतिनियुक्तीद्वारे.—** जर वरिष्ठ लिपिक, गट-क पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठी पात्र आणि योग्य उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अशावेळी प्रतिनियुक्तीद्वारे इतर विभागाकडून समतुल्य पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्ती करण्यात येईल :

परंतु, सामान्य प्रशासन विभागाद्वारे योजलेल्या प्रतिनियुक्ती धोरणामधील विहित नियम व अटींचे पालन करून प्रतिनियुक्ती केली जाईल.

**४. वरिष्ठ लिपिक, गट-क च्या नियुक्तीचा प्रकार पुढीलप्रमाणे असेल :—**

**(क) पदोन्नतीद्वारे.—** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या मंडळाच्या कार्यालयातील वरिष्ठ लिपिक, गट-क पदावरील नियुक्ती, कार्यालयातील लिपिक व टंकलेखक, गट-क पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या आणि या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंडित सेवा असणाऱ्या योग्य व्यक्तीची पदोन्नती करण्यात येईल; किंवा

**(ख) प्रतिनियुक्तीद्वारे.—** जर लिपिक व टंकलेखक, गट-क पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून पदोन्नतीसाठी पात्र आणि योग्य उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अशावेळी प्रतिनियुक्तीद्वारे इतर विभागाकडून समतुल्य पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीची प्रतिनियुक्ती करण्यात येईल :

परंतु, सामान्य प्रशासन विभागाद्वारे योजलेल्या प्रतिनियुक्ती धोरणामधील विहित नियम व अटींचे पालन करून प्रतिनियुक्ती केली जाईल.

**५. हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा :—** नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीद्वारे नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वी अगोदरच मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, शासनाने, त्याबाबतीत, वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील.

**६. संगणक हाताळणी प्रमाणपत्र :—** नियम ३ व ४ येथील पदावर पदोन्नतीद्वारे नियुक्त करावयाच्या व्यक्तीने, उक्त पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वी संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण केलेले नसेल किंवा असे प्रमाणपत्र धारण करण्यापासून तिला सूट देण्यात आली नसेल तर, ती, शासनाने, त्याबाबतीत वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार किंवा काढलेल्या आदेशानुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र, धारण करील.

**७. इतर आदेश/नियम लागू होणे :—** कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीपूर्वी किंवा नियुक्तीनंतर, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा निर्णय यांमध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**महेश वाव्हळ,**
शासनाचे उप सचिव.

**TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 7th October 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. SPB-2021/C.R.09(Part-2)/Sanka-1.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Superintendent, Group-C and Senior Clerk, Group-C, in the office of Stage Performance Scrutiny Board under the administrative control of the Tourism and Cultural Affairs Department of Government of Maharashtra, namely :—

**1. Short title and commencement.**

(*1*) These rules may be called the Superintendent, Group-C and Senior Clerk, Group-C in the office of Stage Performance Scrutiny Board, under the administrative control of the Tourism and Cultural Affairs Department (Recruitment) Rules, 2025.

(*2*) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Maharashtra Official Gazette*.

**2. Definitions.—** In these rules unless the context requires otherwise,-

(*a*) **"Appointing Authority"** means the Secretary of the Stage Performance Scrutiny Board who shall be the competent to appoint a candidate on the post of Superintendent, Group-C and Senior Clerk, Group-C in the Office of the Board;

(*b*) **"Board"** means Stage Performance Scrutiny Board under the administrative control of the Tourism and Cultural Affairs Department.

(*c*) **"Government"** means the Government of Maharashtra;

(*d*) **"Eligibility for promotion"** means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified in the rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time.

**3. Mode of appointment to Superintendent, Group-C shall be as follows :—**

**(*a*) by Promotion.—**

Appointment to the post of the Superintendent, Group-C in the office of the Board shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Senior Clerk, Group-C in the said office and having not less than three years regular and continuous service on the said post ; or

**(*b*) by Deputation.—**

If eligible and suitable candidate for promotion from amongst the post of Senior Clerk, Group-C is not available then, by transfer on deputation of a suitable person from amongst the persons holding the equivalent post from other Department by deputation:

Provided that, the appointment by deputation shall be made by adhering to the terms and conditions as prescribed in the deputation policy framed by the General Administration Department.

**4. Mode of appointment to Senior Clerk, Group-C shall be as follows :—**

**(*a*) by Promotion.—**

Appointment to the post of the Senior Clerk, Group-C in the office of the Board shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Clerk-Cum-Typist, Group-C in the said office and having not less than three years regular and continuous service on the said post: or

**(*b*) by Deputation.—**

If eligible and suitable candidate for promotion from amongst the post of Clerk-Cum-Typist, Group-C is not available then, by transfer on deputation of a suitable person from amongst the persons holding the equivalent post from other Department by deputation:

Provided that, the appointment by deputation shall be made by adhering to the terms and conditions as prescribed in the deputation policy framed by the General Administration Department.

**5. Hindi and Marathi Languages Examinations :—**

A person to be appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations, before getting promoted to the said post.

**6. Certificate in Computer Operations :—**

A person to be appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possesses such Certificate or has been exempted therefrom, before getting promoted to the said post.

**7. Applicability of other Orders/Rules :—**

The terms and conditions specified by the Government, in any rules, order or resolutions issued in this behalf by the Government, from time to time before or subsequent to appointment of any Government Servant, shall also be applicable to Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MAHESH WAVHAL,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.